**नि.दि.मु.क्र.७९/२०१६ मधील आय.ए. क्र. १/२०२१ ते ३/२०२१ (निशाणी ४५ ते ४७) वरील संयुक्तीक आदेश**

निशाणी ४५ कडील अर्ज प्रतिवादी क्र. ५ चे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफीसाठी, निशाणी ४६ कडील अर्ज प्रतिवादी क्र. ५ विरुध्द दावा अवसान पावला तो आदेश रद्द करण्यासाठी व निशाणी ४७ कडील अर्ज प्रतिवादी क्र. ५ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी मिळावी यासाठी दाखल करण्यात आलेला आहे.

**०२.** वादीचे असे म्हणणे आहे की प्रतिवादी क्र. ५ हा मयत झालेला आहे. प्रतिवादी क्र. ५ चे वारस मुदतीत दाखल न केल्याने प्रतिवादी क्र. ५ विरुध्द दावा अबेट झालेला आहे. बेलिफ रिपोर्टमध्ये प्रतिवादी क्र. ५ हे मयत असल्याचे नमूद केल्यामुळे त्याला प्रतिवादी क्र. ५ हा मयत असल्याचे समजले. त्याच्या मृत्यूची कल्पना नसल्याने त्याला अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला असल्याचे व प्रतिवादी क्र. ५ विरुध्द दावा अवसान पावल्याचे वादीचे म्हणणे आहे. प्रतिवादी क्र. ५ब यास नोटीसची बजावणी होवूनदेखील हजर न झाल्याने त्याच्याविरुध्द प्रस्तुत अर्ज एकतर्फा चालविण्यात आलेले आहेत. प्रतिवादी क्र. ५अ व ५क यांनी नोटीसची बजावणी होवूनही त्यांचे म्हणणे दिलेले नसल्याने त्यांच्याविरुध्द प्रस्तुत अर्ज विना म्हणणे चालविण्यात आलेले आहेत. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतलेला आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की अर्ज खोटा व खोडसाळ असून अर्जास दिलेले कारण योग्य व कायदेशीर नाही. प्रतिवादी क्र. ५ हा मालवण येथेच मयत झालेला असून वादी हे त्याच्या राहत असलेल्या ठिकाणापासून जवळच राहत आहेत. अर्जातील कारण संयुक्तीक नसल्याने सदरचे अर्ज नामंजूर करण्यात याव्यात अशी त्यांनी विनंती केली.

**०३.** दोन्ही बाजूच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रतिवादी क्र. ५ हा मयत झाला या तथ्याबाबत प्रतिवादी क्र. १ यांनी कोणताही वाद उपस्थित केलेला नाही. प्रतिवादी क्र. ५ च्या मृत्यूनंतर त्याच्या कायदेशीर

प्रतिनिधींविरुध्द दावा पुढे चालविण्याचा अधिकार टिकून राहत आहे. अर्जात नमूद केलेले कारण हे शपथेवर नमूद करण्यात आलेले आहे. त्यामुळे अर्जातील कारण संयुक्तीक वाटते. सबब, तिनही अर्ज मंजूर करण्यात येतात.

**०४.** प्रतिवादी क्र. ५ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो. तसेच प्रतिवादी क्र. ५ विरुध्द दावा अवसान पावल्याचा आदेश रद्द करण्यात येतो. वादीला मयत प्रतिवादी क्र. ५ चे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेण्याची परवानगी देण्यात येते. त्याअनुषंगे पुढील तारखेस अथवा तत्पुर्वी दावा दुरुस्ती करण्यात यावी व दुरुस्त दाव्याची प्रत सादर करण्यात यावी. दाव्यात दुरुस्ती झाल्यानंतर प्रतिवादी क्र.५ च्या वारसांना दावा आदेशिका पाठविण्यात यावी.

दि. ०१/१०/२०२१ भानुप्रताप ब. चौहान
मालवण दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर

“CERTIFIED TO BE TRUE AND CORRECT COPY OF THE ORIGINAL SIGNED ORDER/JUDGMENT.”

Chandrakala Vasant Chavan
NAME OF STENOGRAPHER